# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १६८-२२ दिनांक - ०८/०६/२०२२

## हौसींग डॉट कॉम पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन फसवणुक करणा-या आरोपीतांना पकडण्यात गुन्हे शाखा, कक्ष-3 विरार यांना यश.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नालासोपारा परिसरात गेल्या काही महिन्यांपासुन हौसींग डॉट कॉम पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने स्वस्त दरात फ्लॅट विक्रीसाठी उपलब्ध असल्याची जाहिरात देऊन सामान्य नागरीकांची फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीतांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त गुन्हे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथक यांनी संशईतांबाबत गुप्त बातमीदाराचे मार्फतीने माहिती मिळवुन आरोपीत नामे १) नसिम बुंदन खान वय - ४२ वर्षे, रा. रुम नंबर २००३, शिव शक्ति नगर चाळ, कामा इस्टेट, कुसुम मसाला फॅक्ट्री जवळ, गोरेगाव पुर्व, मुंबई २) अल्ताफ चांद शेख वय - २४ वर्षे, रा. रुम नंबर ७०३, फेज -२, ऑरेंज हाईस्ट, यशवंत गौरव, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर ३) आशिषकुमार जगदीश सिंग ऊर्फ शेखर सिंग वय - ४५ वर्षे, रा. रुम नंबर १०४, बी, म्हाडा बिल्डींग नंबर ९, बोळींज, विरार पश्चिम, ता. वसई, जि. पालघर ४) दिनेशकुमार मोहनलाल बिष्णोई वय -२१ वर्षे, रा. ३०५, बि विंग, सिध्दीविनायक अपार्टमेंट, शिवम संकुल भवन, सोपारा गाव, नालासोपारा पश्चिम, ता. वसई, जि. पालघर यांना ताब्यात घेऊन त्यांचेकडे गुन्हयाच्या अनुषंगाने विचारपुस केली असता आरोपीत यांनी स्वस्त दरात घर विकत घेऊ इच्छीत सामान्य नागरीकांना हेरुन वेगवेगळया फर्मच्या नावे संपर्क साधुन आरोपीत नामे - नसिम बुंदन खान याचे नावे असलेली डी/५०४, ऑरेंज हाईस्ट नालासोपारा पश्चिम तसेच इतर सदनिका स्वस्त दरात विक्री करीत असल्याचे भासवुन सदर सदनिकाच्या खरेदी व्यवहाराचे पैसे हे बनावट कागदपत्राव्दारे बोगस बॅक खाते उघडुन त्या खात्यावर पैसे स्विकारुन ३४ लक्ष रुपयांची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले असुन आहे. उक्त आरोपीत व त्याचे साथिदार यांचा खालील नमुद गुन्हयात सहभाग निष्पन्न झालेला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | नालासोपारा पो.स्टे | ६९/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| २ | नालासोपारा पो.स्टे | १४८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | नालासोपारा पो.स्टे | १५३/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| ४ | नालासोपारा पो.स्टे | १८८/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |
| ५ | नालासोपारा पो.स्टे | २३१/२०२२ | भा.द.वी.सं. कलम ४२०,४०६,३४ |

नमुद आरोपीत हे नालासोपारा पोलीस ठाणे कडील दाखल गुन्हा रजि नंबर ६९/२०२२ भा.द.वी.सं. कलम ४२०, ४०६, ३४ मध्ये पुढील कारवाई करीता नालासोपारा पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आलेले असुन त्यांना अटक करण्यात आली आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि/ श्री. विलास सुपे नेम -नालासोपारा पोलीस ठाणे, पो.नि/ प्रमोद बडाख, सपोनि/ किशोर माने, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, पोउपनिरी/ उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.हवा/ मनोज चव्हाण, पो.हवा/ मुकेश तटकरे, पो.हवा/ शंकर शिंदे, पो.हवा/ सचिन घेरे, पो.हवा./सागर बारवकर, पो.ना/ मनोज सकपाळ, पो.अं./ राकेश पवार, पो.अं/ अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

---ooo---